Literacy for a Billion

Movie: Jagachya Pathivar
Year: 1960

Song: Jag He Bandishala
Lyricist: G. D. Madgulkar

जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला
कुणी न येथे भला चांगला
जो तो पथ चुकलेला
जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला

ज्याची त्याला प्यार कोठडी
कोठडीतले सखे सवंगडी
ज्याची त्याला प्यार कोठडी
कोठडीतले सखे सवंगडी
हाथकडीची अवजड बेडी
प्रिय हो ज्याची त्याला
प्रिय हो ज्याची त्याला
जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला

जो तो आपुल्या जागी जखडे
नजर ना धावे तटापलिकडे
जो तो आपुल्या जागी जखडे
नजर ना धावे तटापलिकडे
उंबरातले किडेमकोडे
उंबरी करिती लीला
उंबरी करिती लीला
जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला

कुणा न माहीत
सजा किती ते
कोठून आलो ते नच स्मरते
सुटकेला ही मन घाबरते
सुटकेला ही मन घाबरते
जो आला तो रमला
जो आला तो रमला
जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला
जग हे बंदीशाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*